# अबला-विजय

861·6
Le1
5368

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले

प्रकाशक:—
गो. गो. अधिकारी,
सारस्वतप्रसारक मंडळी,
५३३, सदाशिव, पुणें.

( पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकांकडे आहेत. )

मुद्रक:—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
हनुमान प्रेस.
३००, सदाशिव, पुणें.



प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले

पद्यात्मक

# अ ब ला-वि ज य

लेखक

लक्ष्मणशास्त्री लेले

प्रोफेसर, न्यू पूना कॉलेज, पुणें.

इ. स. १९२४.

—:०:—

किंमत चार आणे.

# दोन शब्द

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वत्र विश्रुत आहे. रसिक कवि, मार्मिक टीकाकार, अभियुक्त आलंकारिक, अभिनव नाटककार, समयोचित वक्ते व उत्कृष्ट शिक्षक असा त्यांचा मोठाच लौकिक आहे. त्यांनीं रचिलेलें तथापि अद्यापि अमुद्रित असलेलें ' अबलाविजय ' नांवाचें लघुकाव्य आमच्या नुकतेंच पाहाण्यांत आलें. विनोद, मनोरंजन व बोध यांच्या सुंदर मिलाफानें तें रमणीय उतरलें आहे. प्रोफेसर मजकुरांच्या आजपर्यंतच्या लौकिकास साजेल असेंच तें आहे. प्रस्तुत काव्य प्रकाशित करण्याची परवानगी आम्हीं शास्त्रीबोवांपाशीं मागितली व ती त्यांनीं एकदम दिली याबद्दल त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानितों. या काव्याचा प्रसंग व स्वरूप याविषयीं चार शब्द शास्त्रीबोवांनीं आपल्या मार्मिक व सूचक प्रस्तावनेंत लिहिले आहेत. ती प्रस्तावना यापुढें दिली आहे.

प्रोफेसर लेलेशास्त्री यांच्या प्रत्यक्ष भेटीचा लाभ आम्हांस होतच असतो. तथापि शास्त्रीबोवांविषयीं आदर बाळगणारे पण त्यांस न पाहिलेले असे किती तरी मराठी काव्यवाचक महाराष्ट्रांत व त्याच्या बाहेर दूरवर पसरले आहेत ! शास्त्रीबोवांच्या रमणीय शब्दचित्राबरोबर त्यांच्या छायाचित्राचाही स्पृहणीय लाभ अशा वाचकांस घडावा म्हणून शास्त्रीबोवांचें छायाचित्र या काव्याच्या आरंभीं जोडलें आहे. रसिकांनीं प्रस्तुत काव्याच्या माधुरीचा आस्वाद घ्यावा अशी त्यांस प्रेमाची विनंति आहे. आमच्या सारस्वतप्रसारक मंडळाला या मनोहर काव्यानें मंडित केलें याबद्दल आम्हांस साभिमान आनंद वाटत आहे.

गो. गो. अधिकारी

समर्पणपत्रिका

पुण्यश्लोक श्रीमन्मातुःश्री महाराणी देवी

## अहल्याबाईसाहेब होळकर

यांच्या पवित्र चरणकमलांस

हा

पद्यमय

## अ ब ला-वि ज य

अत्यंत आदरानें

अर्पण केला आहे.

# देवी-श्री-अहल्यावंदन

( गीति. )

देवि अहल्ये ! पुण्य स्मृतिदिन तव उगवला भला आज[1],
वंदन करितो तुजला प्रेमानें अखिल भारतसमाज. १
निज सुचरितें न केवळ होळकरांचाचि वंश उन्नतिला
नेलेंसि भरतखंडहि सकल, ह्मणूनीच पात्र तूं नतिला. २
प्रातःस्मरणांत जनीं असती त्या विमल कन्यका[2] पांच.
तत्पंक्तीस सहावी, सुचरित्रे ! लोकिं शोभसी साच ! ३
श्रीरामें उद्धरिली कीं मुनिजाया[3] तुझ्या मिषें आली !
उपकार स्मरुनि जणों रामोपासकें[4] पतिव्रता झाली ! ४
स्मरण तव स्फुरणप्रद अन्तश्चक्षूपुढें गुणकदंबें[5]
उभवी विमल; तयानें होय मनाला प्रमोद बहु, अंबे[6] ! ५
आर्यापति[7] तव गुणगण गाय प्रेमें रचोनियां आर्या,
वदतो कीं या लोकीं तुजसम धन्या न कन्यका आर्या. ६
समुचिताचि माणकोजी[8] जरि लोकीं हिरकणीस हो सविता.
कृष्णेसि[10] द्रुपद, जनक सीतेसी, तेंवि सृष्टिला सविता[11] ७
तुझिया पवित्र उदरीं आली जन्मासि कन्यका मुक्ता[12].
संगम हृदयंगम हा ! जुळलीं माणीक हिरकणी मुक्ता ! ८
पदवि ' सुभेदार ' मिळवि, पळवी अरि संगरांत मल्हारी[13].
तो श्वशुर तुला लाभे, साक्षात् मार्तण्ड चण्डें[14] मल्हारी ! ९

---

१ श्रावण कृ. १३ श. १८४६. २ अहल्या, द्रौपदी, सीता, तारा मंदोदरी या पांच कन्या. ३ गौतमाची भार्या अहल्या. ४ नासिक वगैरे ठिकाणी अहल्येचीं राममंदिरें आहेत. ५ गुणांचा समुदाय. ६ हे माते. ७ मोरोपंत कवि. ८ अहल्याबाईचे वडील माणकोजी सिंदे. ९ जनक. १० द्रौपदीला. ११ सूर्य. १२ मुक्ताबाई. १३ मल्हारराव. १४ प्रतापी मल्हारी मार्तंड.

मल्हारीस मिळाली फार चतुर धीर गौतमा भार्या
तुज मायसीच झाली सासू, करि तुज समर्थ सत्कार्या. १०
दुर्दैवानें पतिसुत[1]विरह घडविला तुला कठिण पाहें,
जणुं तुजसि जाणवाया सुखदुःखमय प्रपंच हा आहे ! ११
आकस्मिक अग्निमुखी[2]गोलक तनुवरि धडाडला हाय !
पडला, मनोरथांसह मल्हारीच्या, त्वदीय पतिराय ! १२
अतिधीर वीरहीर प्रबल परी मोकलोनियां धाय
अबलेपरि शोक करी धूळीमधिं, हन्त ! लोळवुनि काय ! १३
" होय अहल्या पुत्रचि तुमचा, ती खंडुची नव्हे दार. '
दादां[3]साहेबांनीं ऐसा समजाविला सुभेदार. १४
सौभाग्यमंदिराचा गडगडला कळस तव धरेवरती,
शब्दांनीं वर्णाया स्थिति तव नोहे समर्थ कविवर ती. १५
कठिण प्रसंगिं ऐशा सांत्वाया तुज न माय वा सासू.
पतिसंगें जाया तूं उत्सुक, नव्हतिस रहावया सासु[4]. १६
परि तुजपुढें पसरुनी पदर विनवणी करीति मामांजी[5],
" माझें एक अहल्ये ! बाळे तूं फार लाडकी माझी. १७
माझा खंडू गेला, त्यासंगें आजि तूंहि जातीस ?
पतिसंगें गमन उचित खचित स्त्रीच्या असेचि जातीस. १८
परि मी वृद्ध असें बहु, मज न पळाचाहि भरंवसा लागे.
मेळविलें राज्य विपुल, रक्षिल तें कवण माझिया मागें ? १९
राजपदीं त्वां बैसुनि धर्मन्यायें प्रजेसि पाळावें.
हा राजधर्म आहे; चिंतामणिसम तया झणि वरावें २०
यांताचि पतिला सद्गति तुझिया, तुज मजहि मोक्ष तो यांत.

---

१ पति खंडेराव, मुलगा मालीराव. २ तोफेचा गोळा. ३ रघुनाथराव पेशव्यांनीं.
४ जिवंत ( स+असु ) राहण्यास. ५ मामंजी, अर्थात् मल्हारराव.

मत्स्याचें जीवन सुख सगळें कांहीं असेंचि तोयांत[1] २१
म्हणुनी बाइ अहल्ये! जाउं नको तूं सती, करीं राज्य,
बहु हितकर तें तुजला, अग्निज्वालेसि जेंवि तें आज्य[2] २२
पतिमागें राहुनियां करविं सुताकरविं राज्य ती कुंती[3],
जरि विद्ध तिजसि केलें दुर्दैवानें मनोव्यथा[4]कुंतीं २३
तूं माझा मुलगा, तूं बंधु, सखा सोयराहि तूं असशी,
गादीचाहि धनी तूं, जीवित तूं, सांग काय मम नसशीं ?" २४
गुरु[5]वचन तुवां ऐसें[6] हित मित मधुर प्रसन्न पथकरिलें,
कुलकीर्ति वाढवाया जन पाळायासि राजपद वरिलें २५
" माली ![7] माली ! " करितां शोकावेगें तुझी मति निमाली,
सान्त्वाया तुज झाला समर्थ तइं कंसमथन[8] वनमाली ! २६
धर्मन्यायें केलें तुवां प्रजापालन प्रयत्नानें,
तुजला प्रजासुखानें मोद, न तैसा धनें, न रत्नानें. २७
अनुकंपा दावियली करुणार्द्रे ! त्वां जनां जनिं अनाथां,
तेजास्विता तशी त्वां दावियली चंद्रचूडें[9]–रघुनाथां. २८
धर्म न्याय तसेंची सत्य वचन आवडे तुझ्या कर्णा.
औदार्य तुझें लोकीं खरोखरी आठवोनि दे [10]कर्णा. २९
पाटिलबाबा, नाना, माधव[11], इंग्रज, नृपाल रजपूत.
दिल्लीशहि आदर तुज दाविति देखोनि चरित तव पूत[12]. ३०
परराज्याचा केला नाहिंस अभिलाप आणि अपहार,
जें आपुलें तयाच्या गेलिस कोणा न रक्षणीं हार. ३१

---

१ पाण्यांत. २ घृत ३ पांडूची एक भार्या. ४ मनाच्या पीडारूप भाल्यांनीं. ५ सासऱ्याचें बोलणें. ६ वर सांगितलेलें. ७ अहल्याबाईच्या मुलाचें नांव. ८ भगवान् कृष्ण अर्थात् देव. ९ गंगोबा तात्या व रघुनाथराव पेशवे यांस. १० भारतीय महोदार कर्णाला ११ थोरले माधवराव पेशवे. १२ पवित्र.

ऐसें चारित्र्य तुझें केंवि कवीन्द्रेंहि साध्वि! बोलावें ?[1]
मंदांनीं[2] इतरस्त्रीवृंदां[3] तुजसीं विशंक तोलावें! ३२
तव तेज तप न्याय प्रभाव औदार्य धर्म पुण्यकथा,
हे राज्ञि! हे जननि हे! हे देवि! जना पोंचवोत साधुपथा ३३
ऐसें एकहि हिंदुस्थानिं नसे तीर्थ थोर वा स्थान,
कीं धार्मिक कृत्याची तव जेथें फडफडे पताका न. ३४
श्रीगंगाजलसम[4] जनिं वंद्य तुला मानिताति जन सर्व.
कन्या साध्वी राज्ञी जननी यांचा हरीशि तूं गर्व. ३५
तुझिया कीर्तिसुगंधें दरवळले, देवि! सर्वही प्रांत,
आनंदें जन वंदिति जननीभावें तुला अविश्रांत. ३६
आर्ये! लक्ष्मीबाई झांशीकर कन्यका तुला साजे.
तुजसम तूंचि असा तव लोकांमाधिं कीर्तिदुंदुभी वाजे. ३७
धन्य असे मल्लारी, खंडोजी धन्य, गौतमा धन्य,
धन्य महेश्वर, इंदुर, होळकरांचा सुवंशही धन्य! ३८
धन्य त्वदीय जननें सिंदेकुल[5], भरतभूमिही धन्य.
तव धन्यवाद गाय न, तो धन्याहुनि असे खचित अन्य ३९
पुण्य स्मरण घडो तव! मंगल तें. वाटतें जना शरण[6].
तें न स्मृतिदिनिं होई तरि बरवें जीविताहुनी मरण. ४०

---

१ वर्णन करावें. २ अज्ञांनीं, मूर्खांनीं. ३ इतर स्त्रीसमुदायांना. ४ पेशव्यांकडून अहिल्याबाईस जाणाऱ्या पत्रांत त्यांच्या नांवामागें 'श्रीगंगाजलनिर्मल' असें विशेषण असे. ५ वडील माणकोजी सिंदे यांचा वंश. ६ आसरा.

# प्रस्तावना.

'कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा'

—भगवद्गीता.

रामविजय, हरिविजय अशांसारख्या जुन्या ग्रंथांच्या नांवांवरून प्रस्तुत 'अबलाविजय' त्याच स्वरूपाचा असेल अशी कित्येक वाचकांची सकृद्दर्शनीं थोडी कल्पना होण्याचा संभव आहे. परंतु त्या ग्रंथांहून ही कृति पुष्कळच वेगळ्या प्रकारची आहे. हिला ग्रंथ ही संज्ञा मुळींच शोभणार नाहीं व ती आम्हीं हिला दिलीही नाहीं. या पद्यात्मक विजयांत एकाद्या विवक्षित अबलेचा पराक्रम किंवा अद्भुतरम्य जीवनवृत्तांत वर्णिला नाहीं. यांत कोणतेंही कथानक किंवा संविधानक नाहीं. यांतील प्रत्येक पद्यांत एक किंवा क्वचित् अनेकही स्त्रीलिंगी वस्तूंचें वर्णन, कथन किंवा स्मरण आहे. त्यांत त्या त्या वस्तूचा पराक्रम अथवा विशेष गुण दर्शविला आहे.

निसर्गसिद्ध स्त्रीत्व आणि पुंस्त्व दर्शविणारे शब्द यथाक्रम स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी असावे हें योग्यच आहे. परंतु निसर्गानें नपुंसकलिंगीच असण्यास लायक अशा हजारों शब्दांस खुशाल स्त्रीलिंगी किंवा पुलिंगी मानण्याची रूढि संस्कृतांत व मराठींत पडली आहे ! यामुळें त्या भाषांत लिंगनिर्णय-विचार मोठा गुंतागुंतीचा होऊन बसला आहे. विशेषतः परकीयांस ही गोष्ट फारच नडते. त्यांस त्या भाषांतील शब्दांचीं लिंगें कोशावरून घोकावीं लागतात. अचेतनाला सचेतन मानण्याची कल्पना या स्वैरलिंगव्यवस्थेच्या मूळाशीं असली पाहिजे हें उघड आहे. हिच्याशीं आपला इतका दृढ परिचय झाला आहे कीं, हिचें अलंकार-स्वरूप आपल्या प्रत्ययाला येईनासें झालें आहे. कालिदासाची 'फसवी अंगठी,' किर्लोस्करांचा 'अरसिक शेला' असलीं चेतनोक्तीचीं उदाहरणें पाश्चात्यांस जितकीं चमत्कारावह वाटतात तितकीं आपणांस वाटत नाहींत. यामुळेंच प्राचीन अभियुक्त संस्कृत आलंकारिकांनीं सचेतनोक्तीला अलंकाराचा मान दिला नाहीं. पण

---

१ "एवं नारींमाझारीं । या सातही शक्ती मीं अवधारीं ।
ऐसें संसारगजकेसरी । म्हणता जाहला." —ज्ञानेश्वरी.

प्रस्तुत पद्यावली रचतांना उपर्युक्त स्वेच्छ लिंगविवेक आमच्या फायद्यावरच पडला. कारण अमुक वस्तु स्त्रीलिंगी कां हा प्रश्नच आमच्या मराठी वाचकांच्या मनाला स्पर्श करणार नाहीं !

प्रस्तुत पद्यावलींत सचेतन वस्तु फार थोड्या आहेत; बहुतेक अचेतनच आहेत. अचेतन वस्तु सचेतन मानून त्यांचा विजय या पद्यमालेंत वर्णिला आहे. अर्थात् हिच्यांतील एकच व प्रधान कल्पना अबलेचा विजय ही आहे; आणि त्या विजयाचें सामर्थ्य कोणत्या तरी अतिशायी किंवा प्रकृष्ट गुणांत अभिव्यक्त झालें आहे. मुरली, भवानी, रजनी, विषूचिका इत्यादिकांचें स्वरूप-वर्णन पहा. त्यांत भिन्न भिन्न गुणांचा उत्कर्ष दिसून येईल. स्त्रीलिंगी पदार्थ अबलावर्गांत मोडतात अशी कल्पना करून ते अल्प अवकाशांत जसे आठवले तसे या पद्यमालेंत गोंविले आहेत. केवळ स्मरणावरच भिस्त असल्यामुळें व सगळे स्त्रीवाचक शब्द आणण्याचा दुर्घट प्रयत्न करण्याची मूळचचि इच्छा व हेतु नसल्यानें हिच्यांत अनेक महत्त्वाचेही स्त्रीलिंगी शब्द आले नाहींत, व कित्येक दिसण्यांत अगदीं किरकोळ असेही पुष्कळ स्त्रीवाचक शब्द आले आहेत. अबलाविजय ही एकच कल्पना प्रधान असल्यानें व काव्यदृष्टि अप्रधान पडल्यानें या पद्यावलींत काव्याला प्राय: न मानवणारे असे कांहीं प्रकार आढळतील. कित्येक शब्दांच्या उपान्त्य वर्णावर मराठींत जोर देण्याचा प्रघात आहे. प्रस्तुत पद्यांत हा नियम पाळिला नाहीं. या पद्यात्मक कृतींत योजिलेल्या स्त्रीवाचक शब्दांत विशिष्ट क्रम नाहीं, सादृश्यादि संबंध नाहींत, व कोणत्याही प्रकारचें वर्गीकरण नाहीं. प्रत्येक पद्य स्वतंत्र आहे; त्यांतील वर्ण्य वस्तुही स्वतंत्र आहे. दोन चार शब्द द्विरुक्त झालेले दिसतील; तथापि ते वेगळ्या अर्थांनं योजिले आहेत. एकंदरींत ही पद्यमाला प्राय: सुभाषित–स्वरूपाची आहे. हिच्यांतील प्रधान कल्पनेवरून हिला ‘ अबलाविजय ’ असें नांव दिलें आहे. प्रत्येक वर्ण्य वस्तूचें नांव अवतरणचिन्हांत छापिलें आहे.

‘ सुभाषित व विनोद ’ या मार्मिक व सुंदर निबंधांत सुभाषिताचा अत्युच्च निकष ठरविला आहे. तो अर्थात् विदग्ध पंडितांना समजण्यासारखा व मान्य होण्याजोगा आहे. सामान्य सदभिरुचीला पटतील व तिच्या कसोटीला लागतील अशींच सुभाषितें सामान्य वाचकांना रुचतात व पचतात. आमचे मित्र श्रीयुत मुकुंदशास्त्री मिरजकर यांनीं सुभाषिताचें एक कामचलाऊ लक्षण तयार केलें आहे. तें असें:—

विषया विविधा यस्य प्रायो बोधप्रदं नृणाम् ।
हृद्यं पद्यं पद्यखंडं गद्यं वा स्यात् सुभाषितम् ॥

या लक्षणाप्रमाणें प्रस्तुत पद्यावलींतील पुष्कळशीं पद्यें सुभाषित-कोटींत पडतील असें वाटतें. त्यांनीं सामान्य प्रतीच्या वाचकांची थोडी करमणूक होऊन त्यांस मौज वाटेल अशी कल्पना आहे. इतकें झालें तरी मनोविनोदाच्या दृष्टीनें आमचें कार्य अंशत: सिद्धीस गेलें असेंच होईल. तथापि असल्या विनोदाच्या मिषानें वाचकांच्या मनांत एकंदर अबलावर्गासंबंधानें योग्य आदर व अभिमान उत्पन्न झाल्यास मात्र ही पद्यावली पूर्ण सफल झाली असें मानतां येईल. अबलाजनाच्या बाजूची ही कैफियत आहे असें ह्मटलें तरी चालेल. अज्ञानानें, दुराग्रहानें किंवा दूषित पूर्वग्रहानें ज्यांची दृष्टि भगिनीवर्गासंबंधानें विकृत झाली असेल त्यांनीं हिच्याकडे विशेष लक्ष्य पोंचवावें अशी त्यांस प्रेमपूर्वक सूचना आहे.

आर्यसंस्कृतीला अत्यंत लज्जास्पद अशीं स्त्रीस्वभावनिंदात्मक कांहीं संस्कृत सुभाषितें प्रस्तुत पद्यमाला रचण्यास कारण झालीं. शेंकडों वर्षें अभियुक्त संस्कृत ग्रंथांत तीं कायमचीं होऊन बसलीं आहेत! त्यांच्या विरुद्ध कोणी हूं कां चूं देखील करीत नाहीं याचें आश्चर्य वाटतें! उलट, स्त्रियांच्या विरुद्ध असल्या सुभाषितांचा आधार पदोपदीं प्रतिष्ठितपणें दाखविण्यांत येतो! हरिदास, वक्ते, पुराणिक, कवि, वैद्य वगैरे लोक संस्कृतांतील स्त्रीनिंदात्मक वचनांच्या अनुरोधानें स्त्रीनिंदेची अमोल संधि सहसा वांया जाऊं देत नाहींत! यामुळें एकंदर व्यवरामध्यें स्त्रीजातीविषयीं अत्यंत हीन व अनुदार कल्पना रूढ झालेली आहे! ही मोठी खेदाची गोष्ट आहे! निर्णयसागरी सुभाषितरत्नभाण्डागार व कृष्णशास्त्री भाटवडेकर यांचा सुभाषितरत्नाकर या दोन ग्रंथांतील स्त्रीस्वभावनिंदाप्रकरणें पहावीं म्हणजे आमच्या ह्मणण्याचा प्रत्यय वाचकांस येईल.

वस्तुत: पुरुष व स्त्री यांपैकीं कोणीच जन्मत: दुष्ट किंवा साधु नाहीं. खाणींतून बाहेर काढिलेलें रत्न प्रथम अशुद्ध व ओबडधोबड असतें. तें शाणोल्लिखित होऊन त्याला पैलू पाडले गेले ह्मणजे तेंच तेज:पुंज होऊन खऱ्या मोलाला चढतें. तशीच मनुष्यप्राण्याची स्थिति आहे. त्याला संस्कारानें तेज येतें. मग तो प्राणी

---

१ अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता । अशुचित्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषा: स्वभावजा: ॥ हा अगदीं प्रचारांतला श्लोक आहे!

स्त्री असो वा पुरुष असो. संस्कृति उभयांस सारखीच उपकारक आहे. तिच्याशिवाय दोघेही निस्तेजच रहाणार. एका पुरुषानें गुन्हा केल्यास सर्व पुरुषसमाज दोषी ठरत नाहीं; त्याप्रमाणें एखाद्या स्त्रीच्या हातून अपराध घडल्यास सर्व स्त्रीजाति अपराधी ठरत नाहीं. अपराध कोणींही केला तरी तो वाईटच. त्याबद्दल त्याला किंवा तिला शासन होणें योग्य व अवश्य आहे. मानवप्राणी प्रमादसुलभ आहे. ह्मणूनच स्त्रिया व पुरुष या उभयतांच्या हातून अपराध होणारच. त्याचें प्रमाण शक्य तितकें कमी करण्याचा उपाय उभयतांस योग्य शिक्षण देणें हाच होय. स्त्रियांना अज्ञानाच्या अंधारकोठडींत कोंडून ठेवून त्यांच्या अज्ञानाबद्दल त्यांस उलट हिणविणें; त्यांच्याबद्दल प्रतिष्ठित ग्रंथांतून सुद्धां बेसुमार व बेताल प्रलाप करणें; आपल्या आया, बहिणी, सुना, लेकी यांच्यासारख्या त्या आदरणीय असतां त्यांच्यासंबंधानें प्रच्छन्न अथवा प्रकट उपहास करणें; ही गोष्ट केवळ असमंजसच नव्हे, तर अत्यंत अन्याय्य, कठोर व निर्लज्जपणाची आहे. या गोष्टी वस्तुतः सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ व हिमालयाइतक्या स्थूल आहेत. तथापि त्या कित्येकांस मुळींच दिसत नाहींत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे! कित्येक प्रसिद्ध संस्कृत ग्रंथांतील अवाच्य स्त्रीनिंदा, विचारी विदेशीय समाजांत देखील, हिंदुस्त्रियांविषयीं भलतीच समजूत पसरीत आहे! याचें आह्मांस नुकतेंच एक प्रत्यंतर आलें. तें असें. कांहीं दिवसांपूर्वी पुण्याच्या सेशन्स कोर्टापुढें एक खुनाचा खटला आला. त्यांत आह्मांला पंचाचें काम करावें लागलें. या खटल्यांत एका साक्षीदार हिंदी बाईशीं पोलीसचें वर्तन आक्षेपार्ह झालें असें पुराव्यांत दिसून आल्यावरून आरोपीच्या वकीलानें आरोपीतर्फे भाषण करतांना स्त्रियांच्या योग्यतेविषयीं कित्येक इंग्रेजी काव्यांतून अवतरणें वाचून दाखविलीं व परमेश्वराच्या उदात्त स्त्रीरत्नसृष्टीशीं पोलिसनें अधमपणानें वागणें म्हणजे परमेश्वराचा अपराध करणें आहे असें जोरानें प्रतिपादन केलें. शेवटीं पंचांना खटला समजावून देतांना इंग्रज न्यायाधीश ह्मणाले, " आरोपीच्या विद्वान् हिंदू वकीलानीं वर्डस्वर्थ वगैरे इंग्रेजी कवींच्या काव्यांतून उतारे वाचून दाखवून स्त्रीजनाविषयींचें त्यांचें दाक्षिण्य दर्शविलें तें कोणासही मान्य होण्यासारखेंच आहे. पण हे विद्वान् वकील आपल्या स्वतांच्याच संस्कृत ग्रंथांतील स्त्रियांची संभावना अंगदींच विसरले असें दिसतें! प्रस्तुत खटल्यांत पोलिसानें साक्षीदार हिंदीबाईशीं केलेलें वर्तन त्या मानानें पुष्कळच सभ्य आहे असें मला वाटतें! " हें न्यायाधीशाचें खोचदार भाषण आह्मांस मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागलें! वस्तुतः आर्य स्त्रियांइतक्या उच्च दर्जाच्या स्त्रिया साऱ्या भूमंडळावर सांपडणें कठीण असें म्हटलें असतां अत्युक्ति होणार नाहीं. त्यांचा आपणां सर्वांस सदैव अभिमानच वाटला पाहिजे. प्रस्तुत पद्यें रचतांना हा एकच मुद्दा आमच्या मनांत प्रमुखत्वानें घोळत होता. स्त्री आणि पुरुष निसर्गतः सारखेच संस्कारशून्य आहेत. ते समा-

ज्याचे मुख्य घटक असून त्यांचीं सुखदुःखें परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांनीं उभयतां सुसंस्कृत होऊन, परस्परांविषयीं आदर व प्रेम बाळगून, संसार रमणीय करून सोडावा अशी परमेश्वराची इच्छा दिसते. या इच्छेला अनुरूप वर्तन ठेवावयाचें ह्मणजे पुरुषांनीं स्त्रीजातीविषयींची आपली हीन कल्पना सोडून त्यांस समभावानें, प्रेमानें व आदरानें वागविलें पाहिजे. त्यांस सुसंस्कृत करून गृहिणीत्वाचा मान दिला पाहिजे. स्त्रियांना योग्य संधि दिल्यास त्या पुरुषांप्रमाणें कर्तृत्ववान् निपजतात ही गोष्ट ध्यानांत धरून त्यांनीं भगिनीवर्गाची उन्नति केली पाहिजे. स्त्रिया तुच्छ व उपेक्षणीय वस्तु नसून पुरुषाइतक्याच पराक्रमी, आदरणीय व समाजास आवश्यक व उपकारक आहेत. ही एकच गोष्ट या अबलाविजयांत प्रामुख्यानें सुचविली आहे.

स्त्रियांविषयीं दाक्षिण्य दर्शविणारीं कांहीं अपवादक स्थळें आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. कोठें कोठें व्यासवाल्मीकिप्रमुखांच्या उदात्त काव्यांत व पुष्कळ ठिकाणीं कालिदास, भवभूति वगैरेंच्या रम्य कृतींत आर्य स्त्रियांविषयीं परम आदर दृग्गोचर होतो. या प्रस्तावनेच्या मथळ्यावर उद्धृत केलेलें गीतावचन तर आमच्या अबलाविजय.–कल्पनेचें उत्कृष्ट पोषक आहे. प्रस्तुत वचनांतील कीर्ति, श्री वगैरे सप्त सीमन्तिनी अशा प्रतापशालिनी आहेत कीं प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण 'या मीच' असें अर्जुनाला प्रतिष्ठापूर्वक सांगत आहे ! संस्कृतांत द्वंद्वसमासांत स्त्रीवाचक शब्द प्रथम घालतात. जसें:–राधाकृष्ण, लक्ष्मीनारायण, उमामहेश्वर, सीताराम, मातापितर इत्यादि. यांत स्त्रीविषयक बहुमान सूचित होतो. अग्निहोत्रादि धर्मकृत्यांत यजमानाला पत्नीच्या साहचर्याची आवश्यकता असते. या आचारावरूनही हेंच ध्वनित होतें. मराठींतही आईबाप, बहीणभाऊ असे प्रयोग रूढ आहेत. यावरूनही वरील तर्कच दृढ होतो. तथापि बहुजनसमाजामध्यें स्त्रीजातीविषयीं एकंदरींत हीन कल्पना वावरत आहेत ही गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं.

भरतभूमीला ललामभूत असणाऱ्या देवी अहल्याबाई होळकर यांस ही पद्यमाला परमादरानें समर्पण केली आहे. बाईचा पुण्यदिवस गेल्या ऑगस्ट महिन्याच्या २८ व्या तारखेला आला होता. त्या दिवसाकरितां आम्हीं कांहीं आर्या रचिल्या होत्या. त्या विविधज्ञानविस्तार, चित्रमयजगत् व स्वराज्य यांत प्रसिद्ध झाल्या. तें ' देवीश्री–अहल्यावंदन ' अबलाविजयाची पताकाच आहे. या दृष्टीनें समर्पणपत्रिकेनंतर त्यास मुद्दाम स्थल दिलें आहे. शेवटीं या अल्प विनोदात्मक कृतीचा रसिकांनीं परामर्ष घ्यावा अशी त्यांस सप्रेम विनंति करून आम्हीं त्यांचा निरोप घेतों.

न्यू पूना कॉलेज, पुणें.<br>विजयादशमी, श. १८४६ } लक्ष्मणशास्त्री लेले

# अबलाविजय

## ( गीति )

जो उठतो तो म्हणतो आवेशें बाल तरुण वृद्ध जनीं,
'स्त्री अबला! स्त्री अबला! स्त्री अबला !' अर्थ काय या वचनीं! १
स्त्रीजाति केंवि दुर्बल हें न कळे मुळेंच माझिया मतिला,
पुष्कळ विचार केला तरि पटते अजुनि गोष्ट हे न तिला २
अनृतादिक[1] दोष स्त्रीजनीं स्वभावेंचि राहती वदती,
त्या लोकांची वाटे मजला भ्रमली खरोखरीच मती ३
अबलां विषयीं ऐसा अनुदार विचार लोकिं संचरतो,
म्हणुनि विचाराचा मम ओघ सहज आजि त्याकडे वळतो ४
वस्तु चराचर दिसती स्त्रीवाचक भूवरी अनंत पहा,
त्यांचें कार्य पहातां तद्विक्रम ये निदर्शनासि[2] महा. ५
जीं स्फुरती या वेळीं मतिला तीं सांगतों उदाहरणें,
तीं पाहुनी करावा विचार नरजातिनें उदारपणें ६
वंदीं आरंभीं मी 'सीता' 'मंदोदरी' 'द्रुपदकन्या'
'तारा' तेंवि 'अहल्या' प्रातःस्मरणांत जाहल्या धन्या ७
श्रीमच्छत्रपतींची वंदीं तरवार विश्रुत 'भवानी.'
आश्चर्यप्रद विक्रम जिचा जनामाजि थोर कवि वानी. ८
ब्रह्मगिरीवरुनि[3] निघे श्रीमत्र्यंबकजटोद्भवा[4] 'गोदा.'
तटवासि जन तियेचें सलिल प्राशोनि पावती मोदा ९
विक्रमशाली विक्रम याची नगरी विशाल 'उज्जयिनी'

---

१ 'अनृतं साहसं' इत्यादि श्लोकांत दर्शविलेले दोष. २ अनुभवाला. ३ त्र्यंबकक्षेत्राजवळील सह्याद्रीचें एक शिखर. ४ त्र्यंबकेश्वराच्या जटेंतून बाहेर पडलेली.

श्रीसौंदर्यादि गुणीं झाली लोकीं खरोखरी जयिनी. १०
विनयाची[1] परम सखी, वनितालंकार थोरला, ‘ व्रीडा ’
बाला आरोग्यप्रद तैशी आयुष्यवर्धिनी ‘ क्रीडा ’ ११
स्थलकालांचें अंतर तोडुनि टाकी समर्थ ‘ तसबीर. ’
हें कार्य परम दुर्घट होय कराया न शक्त कविहीरें[2] १२
मोठा किल्ला तरि त्या अपुल्या हातांत ठेविते ‘ किल्ली ’
विस्तीर्ण भरतखंडा भूषविते भाग्यशालिनी ‘ दिल्ली ’ १३
मुक्तिप्रद म्हणुनि वदति मोक्षपुरी, दिव्य म्हणुनियां ‘ काशी ’
विलसे नगरींत, जसी ‘ अरुन्धती ’ तारकांत आकाशीं. १४
हिमवत्कन्या[3] धन्या भारतवर्षी प्रसिद्ध ती ‘ गंगा. ’
स्नानें पानेंहि तिच्या पापांच्या कोटि पावती भंगा. १५
विंध्यकडयांवरुनि उडया मारीताचि पुण्य ‘ नर्मदा ’ धावे.
त्या शर्मदेस[4] वंदिति[5] कीं भवभय आपणां न बाधावें १६
चाले कैसें दावी अद्भुत शारीर यंत्र हें ‘ नाडी. ’
स्वस्थानच्युत होतां मनुजा ती अंतकाकडे धाडी ! १७
मृगपति[6]-शार्दूल-वृक-प्रभृतिस वंद्या असे सदा ‘ अटवी ’
अबला असुनि बलिष्टां आश्रय हें तत्त्व जनमना पटवी १८
वीर करी ‘ ढाल ’ पुढें अरिचा चुकवावया प्रखर घाव,
क्रीडांगणांत तेंवी रथगमनीं धीर देतसे ‘ धांव[7] ’ १९
बोलावितां गणेश प्रेमें येउनि बसे ‘सुपारीं’-त.
पूजन तिचें करावें म्हणुनी, ऐसी पडे जनीं रीत २०
अंतकभगिनी[8] विश्रुत ‘ कालिंदी ’ नामधेय तिस साजे
शरणागतासि उघडी मोक्षाचे तत्क्षणींच दरवाजे २१

---

१ लज्जा. २ कविश्रेष्ठ. ३ हिमालयाची मुलगी. ४ कल्याण करणारीला ५ याला लोक हा अध्याहृत कर्ता. ६ सिंह, वाघ, लांडगे वगैरेंस. ७ पळणें व चाकाची धांव. ८ यमाची बहीण यमुना.

जन्मे महाबळेश्वरिं अतिविमलांगी तरंगिणी ‘ कृष्णा, ’
तृषितांची तेंविच ती भवतप्तांचीहि शांतवी तृष्णा २२
ओजस्वी भोज-नृपालागुनियां योग्य जाहली थारा,
सुरवरनगरीपरि ती मिरवे वसुधातलीं पुरी ‘ धारा ’ २३
जनकाच्या अंकावरि विहरुनि चाले पुढें नदी ‘ तापी, ’
गंभीर रुद्ररूपें दावुनियां यात्रिकांस ती दापी २४
घन अंधकार, हिंस्त्र श्वापदही वरिति आश्रयार्थ ‘ दरी, ’
शिरतां तियेंत वांचाति जरि पुण्य असे नरांचिया पदरीं २५
फिटति न उपकार जिचे कधींहि ती एकली जनीं ‘ माय.’
तिस दुखविल्या ह्मणावें लागे मनुजास जन्मभर हाय! २६
वाचकवर्गालागुनि बहुधा ‘ कादंबरी ’ वरी लागे,
काम बरेंच तयाच्या करमणुकीचें तिच्यावरी भागे २७
‘ कादंबरी ’ परी ती दुसरी पंकीं पित्यांसि लोळविते,
कीर्ति कलंकित करुनी बुद्धि-तनूचीहि हानि घोर विते २८
स्वातंत्र्यप्रिय मनुजा वाटतसे मरणतुल्य ती ‘ अटक, ’
ऐके तो न हितकथा व्यसनांची लागली जया ‘चटक’ २९
आरोग्या आवश्यक होय शरीरास नित्य ‘ आंघोळ, ’
ती नसतां मालिन्यें उद्भवुनी रोग, माजतो घोळ ३०
दुर्दैवानें जाई पुण्यतम प्रेमधाम जरि आई
पाजुनियां स्तन्य जनीं रक्षी दीनार्भकांसि ती ‘ दाई ’ ३१
श्रीरंगपट्टनादि स्थलांसि जीवन समर्पि ‘ कावेरी, ’
जननाची मरणाची तत्स्नानें वारिती पहा फेरी ३२

---

१ आश्रयस्थान. २ बापाच्या अर्थात् सातपुड्याच्या. ३ मद्य. ४ पिणाराला. ५ प्रसवते, उत्पन्न करिते. ६ अंगावरील दूध. ७ अनाथ बाळांस.

बोलोनी राग मधुर रसिकमनीं रागे उपजवि ‘ सतार, ’
  अबला असुनि निसर्गें, पुंस्त्वानें मिरवते बुधीं ‘दारे’ ३३
चैतन्याचें अगदीं स्पष्ट गमक मान्य मानवांसि ‘ गति, ’
  बालां माता, भजकां गीता, आर्तांसि औषधीच ‘ गती ’ ३४
लीला करी ‘ उपाधी ’ जेंवि ‘ नटी ’ रंगभूमिवरि लोकीं.
  ‘चिंता’ चिताच, जाळी ती मनुजाच्या मनासि अवलोकीं ३५
अर्थालंकृति आद्या रसिकांना मान्य जाहली ‘ उपमा, ’
  प्रतिभायुतकविकृतिला तिच्यामुळें येतसे सदा सुषमा ३६
सौभाग्याची मिरवे उच्च पताका जणों शिरीं ‘ कबरी, ’
  मोक्षासि पात्र झाली श्रीरामपदाब्जमधुकरी ‘ शबरी ’ ३७
दगडाला देव बनवि, मनुजाला साधु, या जनीं ‘ कांव, ’
  न कळों दे धूर्ताही चोर कवण होय कवण तो साव ३८
आरोग्याचें ह्मणुनिच सकळ सुखांचेंहि मूळ ती ‘ निद्रा. ’
  मंगलकार्य घडे नचि गेहांत नसे पहा जरि ‘ हरिद्रा ’ ३९
दुबळें शहाणपण जनिं अधिकार जनांत गाजवी ‘ सत्ता, ’
  शरण तिला जाय न बुध तरि पाठीवरि बसे तया लत्ता! ४०
‘ लक्ष्मी ’ सर्वां वश करि, तेंवी मैत्री विरोध ती घडवी,
  नेई रसातळाला रोषें, तोषें महापदा चढवी ४१
वंदावीच ‘ हरिदिनी ’ ती हरिच्या कीर्तनासि आयकवी.
  ‘ सज्जनसंगतिमहती ’ पुण्यप्रद या जगांत गाय कवी ४२
बलवंताही *रुग्णा आणी रंजीस चिकट ‘ संग्रहणी, ’
  पुरुषाला ‘ कुशलमति’च साह्य करी नित्य अर्थ-संग्रहणीं ४३

---

१ प्रेम, आनंद. २ या शब्दाचा अर्थ भार्या असून संस्कृतांत हा पुल्लिंगी मानला आहे ! ३ सूचक, दर्शक. ४ गमन; हालचाल. ५ आधार. ६ पदवी, गुण वगैरे. ७ मोठी शोभा. ८ बुचडा. ९ रामोपासक भिल्ली. १० गेरु. ११ हळद. १२ एकादशी. * रोग्याला. १३ आंव.

एकचि 'तोफ' निजगुणें शत्रुगणा स्वर्गमार्ग दाखविते.
तन्नामहि मनुजाच्या हृदयीं वहु थोर कंप उपजविते ४४
प्रसवे कवि, वीर, नृपति, सज्जन, शिल्पी, अशा जना ' शाला '
सांगा केंवि तियेच्या गावें आम्हीं मनोहर यशाला ? ४५
पुरुषाच्या तोंडावरि वर्चस्व ' मिशी ' पहा सदा मिरवी !
अनुनय तिचा कराया नर वरिवरि कर तिच्यावरी फिरवी !
पायांत ' बिडी ' पडतां वीरहि नर फार होतसे कष्टी
अंधहि नर मार्ग क्रमि हाता येतांचि त्याचिया 'यष्टी' ४७
शीतालागि निवारी चिंध्या जोडोनि निर्मिली ' कंथा '
मनुजाला मरणाच्या ' विषूचिका ' दाविते अचुक पंथा ! ४८
दुग्धा नवनीत, फुला सौगंध्य, तशीच वाङ्मया ' कविता '
कीर्तनरंगीं डोले नर ' सारंगी '–स्वरासि आयकितां ४९
श्रीकृष्णाची परिसुनि मृदु मधुर स्निग्ध लाडकी ' मुरली '
मनुजाची काय कथा सुखतृष्णा मृगकुलासही नुरली ! ५०
साधाया पुरुषार्थ ' प्रकृति–'विणें होय पुरुष असमर्थ.
' वाणी–'शिवाय कोठें बसेल अन्यत्र मधुरसा अर्थ ? ५१
तप आचरोनि लोकीं प्रखर मनुज ' सिद्धि ' आत्मवश करिती,
'मृति, सकलांसी ग्रासी; ' रति'--लागीं हृदयमंदिरीं वरिती ५२
गानकलाभिज्ञाला 'वीणा' वाटे बहिश्चर प्राण.
' उद्यमवृत्ति नराला कोठें लवही पडों न दे वाण. ५३
' चूल ' घरांत नसे तरि केंवी भोजन मिळेल सुग्रास
' केरसुणी ' न फिरे गृहिं तरि होई त्रास फार नेत्रांस. ५४

---

१ आर्जव. २ गोधडी. ३ महामारी. ४ पशुसमुदायास सुद्धां. ५ धर्म, अर्थ, काम व मोक्ष. ६ प्रकृति व पुरुष यांची जोडी सांख्य व वेदांत यांत प्रसिद्ध आहे. ७ बाहेर फिरणारे.

मोठें भाग्य समजती जईं मिळे ‘ पालखी ’ बसायास.
‘ खिडक्या ’ असतां भवना पवना फिरतां पडे न आयास. ५५
जीवाला कंटाळति त्यांस कधीं देइ आश्रय ‘ विहीर ’
म्हणुनाचे जीवनदानीं समर्थ ती वर्णितात कविहीर। ५६
जनतृष्णेसि हराया वाहति संतत ‘ तरंगिणी ’ भुवनीं.
दिसते दुसरी कोणी ‘ नति’—तुल्या कार्यसाधिका न जनीं. ५७
‘ माळा ’ गळां पडुनियां मंगलविजयादि—सूचना करिती.
‘ रंगावलि’ गूढार्थ-प्रकाशनीं फार निपुण कीं असती. ५८
वक्रहि ‘ इंदुकला ’ ती रमणीय गमे जनास फार जनीं.
शांतिप्रदा बहुरुचे मना तमस्तोमधामेंही ‘ रजनी ’ ५९
शास्त्री पंडित कर्मठ सर्वचि ‘ रूढीस ’ मान वांकविती.
वर्णोनि दाखवीती कुशलपणें लोकिं मानवा कवि ती. ६०
‘ सुट्टी’—शीं बाळाची गट्टी; रुग्णासि मानवे ‘ गोळी ’.
अरिला परि लोळवि ती, दीनाला राक्षिते पहा ‘ झोळी ’ ६१
कैबर खचेल तरि मग वरचा तोलील कवण तो भार ?
संख्यातीत जनांना होतात ‘ कला’चि जीवनाधार. ६२
लावी आग घराला पेटीमधली लहानशी ‘ काडी ’.
देई सौख्य जनाला पहिल्या मजल्याहुनी अधिक ‘माडी’ ६३
उंचावरली वस्तू करगत व्हाया ‘शिडी’च उपयोगी.
‘ दाढी ’ बनवी अपुल्या गांभीर्ये मानवा महायोगी ! ६४
मषिकोद्वितीय करिते कृष्णमुखी ‘ लेखणी ’ विलास किती !
सुखदुःखाब्धिस आणी भरती आणीक ओहटी जगतीं ६५

---

१ पाणी व प्राण; हें श्लिष्टपद आहे. २ नद्या. ३ रांगोळी. ४ गुप्त अर्थ उघड करण्यांत. केशवसुतांची ‘ रांगोळी काढतांना पाहून ’ ही कविता पहा. ५ अंधकाराच्या समुदायाचें घर. ६ औषधाची. ७ बंदुकीची. ८ शाई आणि लेखणी. ९ काळतोंडी.

'कलिका' सरसा मधुरा मृदुला सुभगा सुगंधगुणयुक्ता,
तेजस्तरेल सुवृत्ता स्वच्छ जशी मान्य होय ती 'मुक्ता' ६६
संतत 'अश्रुधारा' साध्वीची अखिल विश्व कांपविते,
ती त्र्यक्षरी 'परीक्षा' लाजविते निर्दयां तया पवितें, ६७
'भाकर' जगतीं साऱ्या प्राण्यांना करुनि टाकिते दास.
'भगवद्भक्ती'–वांचुनि कीर्तन सगळेंचि होय खेदास. ६८
'वीज' घनांत; 'प्रतिभा' कविहृदयीं, आणि 'लहरि' उदधींत,
उठती विहरति विलसति कौतुक उत्पन्न करिति नरधींत ६९
श्रीमंत-गरीबांला सुख देते 'शेगडी' समान पहा.
ती 'तागडी' बनविते रंकासि कुबेर ! हा विलास महा ! ७०
रत्नसुवर्णादि जिच्या उदरांत सुखें निवास करितात;
ती 'खनि' केंवि न होई सन्माना पात्र सांग जगतांत ? ७१
'कस्तूरिका' परिमलें इतर सकल सौरभांसि लाजविते.
कंटकमय 'केतकि' ही निजगंधें रसिकहृदयिं चोजविते ७२
संतापरि तत्कालाचि अपुल्यासम करुनि टाकिते, 'मूस'
उन्नत पदासि चढवी जगतिं 'सदाचारपद्धति' लबूस. ७३
आतंप पर्जन्य तसा पवन तयांना निवारिते 'छत्री.'
तांबूला रुचि देती 'लवंगिका' 'एलची' तशी 'पत्री.' ७४
आनंदाचा अनुभव घडतांक्षणिं मनुज वाजवी 'टाळी'
परें--नरवर--पूज्यांच्या शिरिं 'चवरी' भक्त-दास-जन ढाळी ७५
भोजनसाहित्यांत प्रमुखत्वें गणियली असे 'कणिक'
'नीति' प्रसिद्ध ती जानिं जी बोले विदुर 'आणखी' कणिकें. ७६
दीनावनार्थ जाणों अवतरलीसे जनांत 'पासोडी'

---

१ कळी. २ कांतीनें चमक मारणारी. ३ वाटोळी व सुशील. ४ मोतें. ५ कठोर वज्राला. ६ खाण. ७ सुगंधांस. ८ केवडा. ९ कौतुक उत्पन्न करिते. १० ऊन्ह. ११ देव, राजा व गुरू यांच्यासारखे वंदनीय. १२ अनुक्रमें उपासक, नोकर व सामान्य जन. १३ भारतश्रुत.

जोडी[1] ‘छाया’ शीतल उष्ण समायीं मनुज आतपा[2] सोडी ७७
पीयूषपाणि[3] वैद्य प्रबल गदांवरैं[4]ति योजितो ‘ मात्रा, ’
सुखवी सुधवल शीतल नयनसुभग ‘ चंद्रिका’ मनुजगात्रा ७८
पुष्पें फलें सुपल्लव मोहर यांलागि लागते ‘ परडी, ’
वृश्चिक-तनुवरि टाकी ‘पाल’ पहा आपुली नजर करडी. ७९
उद्यमनिरत प्राण्यांमध्यें नांवाजली जनीं ‘ मुंगी, ’
संगीतकलुब्ध मृगां, अनंततनयांहि[5], डोलवी ‘पुंगी’. ८०
जनिं बालवीरहस्ता मूर्तश्री[6] ‘ धनुकलीच ’ शोभविते,
‘ चिमणी ’ ‘ भिंगोरी ’ ही बालकहृदयीं असीम[7] मोद विते. ८१
विद्या प्रकट कराया साधन बहु मान्य पंडितासि ‘सभा’.
‘विद्युल्लता’ विलासें शोभवितें आपुल्या अनंत नभा. ८२
कोमल[8]पल्लवरक्ता ‘वीटी[9]’ अधरासि निजरसें खुलवी.
बुद्धिप्रद निजवीर्यें ‘विजया[10]’ परमेश्वरा[11]सही भुलवी ८३
‘आशी[12]’ वितरी[13] जगतीं दिसणाऱ्या सकल मंगलें[14]श्रेणी.
तारी गंगायमुना[15]सरस्वतींची मनोहरा ‘ वेणी ’ ८४
श्रीकृष्णाला ‘ तुलसी ’ होय अतिप्रिय तिच्या बहु गुणांनीं.
तो तुलसी-दासहि जनिं आदरिला साधुनींही नमनांनीं. ८५
शिरसा वंद्य असे श्रीज्ञानेश्वर-साधुची मधुर ओंवी
सहृदय वाङ्मय-सेवक सुवृत्तमालेमधें तिला गोंवी. ८६
श्रीरामाला रुचली अरण्यवासीं पवित्र ‘पंचवटी’

---

१ मिळवितो, सेवितो २ उन्हाला, तापाला. ३ अमृत आहे हातांत ज्याच्या असा, अर्थात् यशस्वी. ४ भयंकर रोगांवर ५ सर्पास ६ प्रत्यक्ष लक्ष्मी ७ अमर्याद, पराकाष्ठेचा ८ कोंवळ्या पाल्याप्रमाणें लाल. ९ विडा, पट्टी. १० भांग ११ शिवाला. १२ आशीर्वाद १३ देते १४ पुष्कळ मंगल वस्तु १५ या नद्यांचा प्रयाग येथील संगम.

आतंकान्तक योजी भिषग्वरेण्य 'प्रभा'–भिधादि "वटी' ८७
अति लघु नीरस, वर्णं गंधेंही शून्य, होय जरि ' कोय '
फलपुष्पांकित तरु ती होते, मिळतां सुमृत्तिका तोय. ८८
बहु रूपें धरुनि जनीं निर्भय लोकांत वावरे ' वार्ता.'
सुखिताला दुःखित करि, तेंवि प्रमुदित करीतसे आर्ता ! ८९
पादत्राण कराया समर्थ लोकांत बोलति ' वहाण '
रत्नोल्लेखनिं चंदनघर्षणिं पाणिग्रेहीं तसि ' सहाण '. ९०
गृह घट बहुलें दुर्ग प्रतिमा यांलागि लागते ' माती '
क्षेत्रांतिल ' भूमि ' गमे अखिलाही त्या कृषीवला माँ ती. ९१
साध्वींच्या सुतनुवरी शोभे बहुसाल कृष्ण ' चंद्रकला '
सितपक्षांत विराजे निजतेजें अंबरांत ' चंद्रकला ' ९२
मंदाग्निरुग्ण मनुजा सांवरिते निजगुणें झणीं ' कांजी '
तत्सेवानें न वळावी तन्मति आरोग्यकांक्षिणी कां जी ? ९३
वसनांमध्यें बहुमत कन्येलागोनि इलकली ' साडी '
मोठें वैभव वाटे कांचनहीना कृषीवला ' वाडी '. ९४
भुवनांत कुलवधूंचें अखंड सौभाग्य मिरविते ' वेणी '
रचनाकौशल दावी अखिलहि भोज्यांत सुंदरा ' फेणी ' ९५
बहु अघटित कार्य करी केव्हां केव्हां जनांत ' घोरपड. '
तत्साहाय्यें मिळवी तानाजी वीरसिंह सिंहगड. ९६
बहुमोल अलंकारीं श्रेष्ठपदा पावली असे ' मुक्ता '
सत्संगति गुण धरिती; थोरांची संगती असे युक्ता. ९७
व्यसन ' जुगार ' असे बहु कीर्ति-श्री-वीर्य-हानिकर खास.
कंठरवानें सांगे ऐसें श्रीभारताख्य इतिहास. ९८

---

१ रोगाला मारणारी २ वैद्यश्रेष्ठ ३ चंद्रप्रभा वगैरे गोळ्या ४ पाणिग्रहणाच्या वेळेला ५ किल्ला ६ चित्रें ७ शेतकऱ्याला ८ लक्ष्मी. ९ शुक्लपक्षांत १० आकाशांत ११ अग्निमांद्यानें अजारी १२ मोतीं. १३ दोरे

देवाच्या नांवाचें स्मरण घडविते म्हणोनियां ' स्मरणी '
वर करवली विहीणहि यांच्या तोषार्थ जन्मली ' करणी ' ९९
' करणी ' सुधेंतै बसवी वीट; विटांची उभी करि ' कमान '.
पाहुनि इंद्रधनुपरी तिस कुतुकें डोलवी रसिक मान १००
' घटिका ' युगैघटिका ती, मुहूर्तघटिकाहि लग्नमुंजींत.
बहुमान्य ' शकटिका ' ती, बैसुनियां फिरति धनिक जन जींत.
' घागर ' जीवनदात्री वाटे मरुजनपदांत सागर ती,
नुरवी तृषालवहि बहु आदर लोकांत पावती ' गैरती ' १०२
गुणतारतम्य जाणे पूर्णपणें एकटी जनिं ' कसोटी '
पंडित जन आदरिती हर्षें आनंददायिनी ' कोटी ' १०३
तपकीर नथ तमाखू मोतीं गुटिका लघूदरांत ' डबी '
वागवि; गमे प्रिय जनीं प्रत्येका आपुलीच फार ' छबी ' १०४
ग्रंथांतील विशद करि विषमै पदें, गूढ अर्थही, ' टीका '.
वृद्धपणीं आडविती दृष्टीसी कष्टदायिनी ' टीका ' १०५
मुखचुंबिनी श्रवणमधुर अन्वर्थक ' सुंदरी ' जनीं सरसा.
' सारंगी ' रंगांगणिं नसतां साहाय्य नर्तकी विरसा. १०६
धन्याचि ' पाणपोई ' भागविते निज रसें जनिं तहान.
जननीसे तिस वाटति तुल्य सकल थोर आणिक लहान १०७
ग्रीष्मांतीं तप्त जना सुखवाया मेघ[१४] वर्षती ' गारा; '
वर्षाकालीं अवनी वसुसम्पन्ना करावया ' धारा ' १०८

---

१ मानपान २ गंवड्याचें गिलावा लावण्याचें हत्यार ३ चुन्यांत. ४ युगाचा घटकावयव, युग बनविणारी ५ मंगल कार्यांत मुहूर्त बनविणारी ६ गाडी ७ शीलवती सुवासिनी ८ लहानशा पोटांत ९ कठीण, दुर्बोध १० वृद्धपणामुळें डोळ्याला येणाऱ्या ११ पांव्याच्या जातीचें एक मधुर वाद्य. १२ नाचणारी कलावंतीण १३ हिरमुसलेली. १४ गारा व धारा वर्षती इ. अन्वय.

मस्ती शमवुनि सारी दुरी शरीरांतली पळवि सुस्ती,
ऐसी उपकारक बहु मल्लालागोनि आवडे ' कुस्ती ' १०९
कुल-विनय-शील-मधुरा उभयकुलोद्धारकारिणी ' कन्या '
नर-वीर-हीर-जननी पावे लोकांत मान्यता धन्या ११०
सुहृदांस वरिष्ठांसहि वरचेवर आवडे दिली ' भेट '
' भक्ति ' ज्ञानविशुद्धा श्रीहरीचरणांस पोंचवी थेट १११
कटुभेषजनिर्विण्णा रसना करि साफ फार ' खारीक '.
अतिदूर वृत्त नेई शीघ्र जरी ' तार ' फार बारीक. ११२
काळाची दूति जणों मनुजांच्या लागते ' जरा ' काना.
अपुल्या सामर्थ्यानें वांकविती त्यांचिया पहा माना. ११३
संभावितासि ' कीर्ति 'च उत्तम धन, यंत्र चालवी ' कळ 'ती.
'स्मृति' कुशल तोंवरी नच मनुजांची बुद्धि अल्पही मळती ११४
' खुर्ची ' आसन शिष्टां सम्मत, त्यापरिस ही गमे कोच '
तीवरि बैसायाचा होई लवही तयां न संकोच ११५
गृह बंधु ग्राम नगर देशहि उध्वस्त करितसे ' फूट '
त्यांचें मीलन सुंदर करुनी सामर्थ्य त्यांसि दे 'जूट ' ११६
न रणीं तोफहि; विपिनीं व्याघ्रहि; गृहिं जेवि घाबरवि ' नरणी '
क्षुब्ध प्रचण्ड अर्णवकल्लोळीं तारि मानवां 'तरणी ' ११७
भोजनसमयीं पावे व्यंजनें-वस्तूंत मान बहु ' देठी '
'मोहरि'ची तडफ कठिण; दाखविते ती क्षणांत जगंजेठी! ११८

---

१ सत्कुल, नम्रपणा, चांगलें आचरण यांच्यामुळें सुंदर. २ पित्याचें व पतीचें कुल उद्धारणारी ३ मित्रास दर्शन व वरिष्ठांस नजराणा. ४ डोलस ५ कडू औषधें घेऊन विटलेली ६ नख काढण्याचें हत्यार ७ समुद्राच्या लाटांत ८ नाव. ९ तोंडीं लावण्याच्या पदार्थांत. १०मस्तकांत भणभणल्याबरोबर देवाची आठवण करून देते!

श्रीची ज्येष्ठा भगिनी प्रताप जनिं गाजवीतसे ‘ अक्का ’
सत्ता तिची निवारी जरि नर होई समुद्यमीं पक्का. ११९

हृदयाचें अवगुंठन[1] आवडतें अंगनांस ‘ कांचोळी ’
बसतां ‘ चपेटिका[2] ’ मुखिं अपराधी मनुज गल्हे[3]कां चोळी ! १२०

प्रज्ञां[4] बालां दुर्गुण इन्धन यांची क्रमें रुचे ‘ होळी ’
‘ मधुमक्षिका ’ कुशलता दावी रचुनी विचित्र मधु[5] पोळी १२१

‘ अष्टाध्यायी[6] ’ ग्रंथ त्रिभुवनवंद्य प्रथा[7] अशी आहे.
निजसूत्रसूक्ष्मजालें संस्कृत वाणी निबद्ध करिताहे. १२२

उठतां एकाएकीं वेगानें ती प्रचंड ‘ वावटळ ’
भूमंडल रविमंडल घनमंडल एकवटाति एक पळ ! १२३

मान्य कुलशीलवती व्हावी[8] पूर्वीं जनांत ‘ नवरी ’ ती
संप्रति कन्येकरितां मागाति हुंडा, विचित्र नव रीति ! १२४

जयदेवाची[9] सुमधुर सुललित रासिकांस वंद्य ‘ अष्टपदी[10]. ’
करिते वधूवरांचा संगम शाश्वत ‘ विवाहें[11]सप्तपदी. ’ १२५

कोठेंही केव्हांही प्रियाचि असे बालकां बहु ‘ मिठाई ’
भोळ्या भक्तां तैसी पंढरिची माउली जनिं ‘ विठाई. ’ १२६

कंठीं पडुनि नराला आत्मगुणें भूषवीतसे ‘ कंठी. ’
यत्कांठिं ‘ गंडमाळा ’ दुःखानें सर्व जन्म तो कंठी[12]. १२७

लोकीं लहानथोरां लिहिणें पडते कधीं कधीं ‘ अर्जी. ’
धनिकांची गरिबाला संपादावीच लागते ‘ मर्जी. ’ १२८

---

१ झांकण्याचें वस्त्र. २ चापट. ३ गाल. ४ शहाण्यांना दुर्गुणाची व मुलांना सर्पणाची होळी आवडते, असा अर्थ. ५ गोड. ६ पाणिनीनें रचलेला आठ अध्यायांचा व्याकरणावरील सूत्रग्रंथ. ७ लौकिक. ८ (मान्य) होत असे. ९ गीतगोविंदकार कवीची. १० गीतगोविंदांतील आठ पादांचीं पद्यें. ११ वधूवरांनीं सात पावलें बरोबर जाण्याचा विधि. १२ घालवितो.

स्वार्थाकरितां लांछन, परार्थ भूषण, अशी असे ‘ भिक्षा ’
  चोरा, शिष्या, मनुजा, अश्वगजांनाहि हितकरी ‘ शिक्षा ’ १२९
यज्ञारंभि यथाविधि घेई यजमान आदरें ‘ दीक्षा. ’
  मर्मस्थानें दावी मनुजाला झडकरी जनिं ‘ समीक्षा. ’ १३०
मारी कलाटणी व्यवहारिं करारांत, परम कठिण, ‘ अट. ’
  ‘ सुसरी ’ ओढुनि सलिलीं करि जीवाला क्षणामधेंचि गट. १३१
वदना सदना शिष्या व्रणा श्रुतिज्ञास लागते ‘ पट्टी. ’
  लोकिं समव्यवसायीं समव्यसन यांत होतसे गट्टी. १३२
लोहादिकांसही द्रव आणी वेळांत अल्पशा ‘ भट्टी. ’
  ‘ किमया-’ संसर्गानें सुवर्णपद पावते पहा मट्टी ! १३३
रवि चंद्र विप्र सज्जन मांत्रिक यांना रुचे ‘ अमावास्या. ’
  अतिकृष्ण वस्तुही तिस पाहुनियां खालिं घालिते आस्या १३४
चोरा प्रेता कृपणा व्याधा तृषितासि मानवे ‘ खांचं ’
  अंधा अज्ञमदांधां मात्र जनीं ती करीतसे जाच. १३५
सुखकर पुष्टिप्रद बहु दुग्ध अमृततुल्य देतसे ‘ गाय. ’
  तें दुर्मिळ होतां क्षणिं भारतशिशु रडति मोकलुनि धाय. १३६
कापी मोठे मोठे कंद मुळे भोपळे लहान ‘ विळी ’
  ‘भिकबाळी’ श्रुति शोभवि; ‘काळपुळी’ प्रबल मानवाहि गिळी. १३७
पाथिका ! विचार कसला ? कां बापा अडचणींत तूं पडशी ?

---

१ शासन, वळण, शिक्षण. २ सूक्ष्म अवलोकन. ३ विद्याची, घराची, आंखण्याची, मलमाची, वेदपठणाची पट्टी. ४ सारख्या धंद्याचे व दुर्गुणाचे. ५ रविचंद्रांना भेटण्याला, विप्रसज्जनांस तर्पणादि कार्यें करावयाला व मांत्रिकांना मंत्रविद्या शिकावयाला अमावास्या उपयोगी. ६ मुखाला. ७ चोराला चोरलेलें द्रव्य पुरावयाला, प्रेताला पुरण्याला, कृपणाला निधि ठेवण्याला, पारध्याला शिकार फसविण्याला आणि तान्हेल्या माणसाला तहान भागविण्याला खांच उपयोगी पडते. ८ कानाला.

अडशी कां हें नुमजे, संग्राहकें जवाळिं असुनियां ‘ पडशी. ’ १३८
भक्षक असो कसाही ‘ माशी ’ त्या लाविंतेचि ओकाया.
सारुनि केर दुरि वदे ‘ केरसुणी ’ स्वागतासि ओका यां. १३९
लोकांत अन्नपूर्णा अवतरली मूर्तिमन्त काय ‘ भिशी ! ’
पांथा ज्ञातिविहीना ! ही तुजसी मायसीच ! काय भिशी ? १४०
‘ रसना ’ भाषणकुशला चातुर्यें षड्रसांसि पारखिते.
क्रुद्धा तरि लीलेनें बत्तिसही त्या द्विजांसि कांपविते ! १४१
दरबारीं शिष्टभवनिं पावतसे मान थोर ‘ सतरंजी ’
दीपावलिपर्काली अग्रस्थानीं बसे लघु ‘ करंजी ’ १४२
गेहांत सर्वतोमुख वंद्य तमोनाशिनी वसे ‘ समई. ’
काच-प्रदीप फुटती वरिवरि जन आठवे तिलाच तई. १४३
वीराला सुजनाला ‘ क्षमा ’ गमे थोरला अलंकार.
‘ मेधा ’ ज्या वश त्यावरि विद्यादेवी प्रसन्न हो फार १४४
बाल असो तरुण असो वृद्ध असो ती जलाल वहु ‘ मिरची. ’
व्यंजनपदार्थनिवहा निजवीर्यें हृद्य फार रुचि विरंची. १४५
कवडी कवडी करितां सोन्याची सहज जुळतसे ‘ लगडी. ’
चीवरगोमयजनिता सुवर्णयुत नरशिरीं वसे ‘ पगडी ’ १४६
पर्णें जुळवुनि त्यांचें पात्र करितसे प्रशस्त बहु ‘ चोय ’
बैसायाची होई पक्वान्नांची तयामुळें सोय. १४७
प्रकृतीनें सुदृढ तशी गरमहि भारी स्वदेशिंची ‘ खादी. ’
उपयोगी व्यवहारीं होय मृदंगादिवादना ‘ वादी ’ १४८

---

१ (वस्तु) बाळगणारी २ (या) ओका (घराला) या अशा स्वागतासि वदे इ० अर्थ. ३ खाणावळ ४ निराश्रिता ५ भितोस ६ दातांस ७ सर्व बाजूंना तोंडें असलेली. ८ अंधकाराला नाहींसा करणारी. ९ ही कोणत्याही स्थितींत तिखटच असते. १० ताडों लावण्याच्या पदार्थमात्राला. ११ चव देते. १२ चिंध्या व शेण यांची केलेली. १३ चांगल्या रंगाच्या वस्त्रानें आच्छादलेली.

डोईवरि बैसुनियां मिरवे आबालवृद्धजानें ‘ टोपी.’
पागोटयाहुनि हलकी मूल्यें भारेंहि; वाटते सोपी १४९
‘ ठिणगी ’ स्वविक्रमानें एका निमिषांत होतसे ‘ आग. ’
निववी जननयनांतें पुष्पफळीं डवरली पहा ‘बाग.’ १५०
बालांचें मन हरिते भारी टोपीवरील ती ‘ टिकली. ’
‘ कुंकुमटिकली’ची बहु आवड संप्रति वधूजनीं पिकली १५१
विप्रासि ‘ दक्षिणा ’ प्रिय, तैसी ‘ पूज्य–प्रदक्षिणा ’ सुजना.
‘ क्रीडा ’ बालां; ‘व्रीडा’ स्त्रीला; तेंवी ‘ समाधि ’ साधुजना.
‘ दुर्बुद्धि ’ धवल यश जानें मनुजाचें नेहमींच हारविते.
नवनीत-जन्मसमयीं वंदावें लागतें प्रथम ‘ रवि’-तें १५३
क्षणभंगुर मंजुलरव कंपित करि ‘ बांगडी ’ महायतिला.
नचि सौभाग्यवतीचा मणिबंधवियोग होय सह्य तिला १५४
‘ शुंडा ’ गजतुंडाला प्रबल करुनियां उदंड शोभविते,
मानवरत्नें उज्ज्वल बहुमूल्य महानुभाव ‘ कूस ’ विते १५५
लोकांत गारुडयाची लहानशी ‘ पोतडी ’ भ्रमवि मतिला,
दुसरी सृष्टीच उभी करुनी दावी जना चमत्कृतिला १५६
दाखवि वस्तु यथावत् सृष्टींतिल विमल ‘ आरशी ’ नेत्रा.
सुखकर जीवन हर्षें पोंचवि अल्प ‘ प्रणालिका ’ क्षेत्रा १५७
केव्हां जनीं भयंकर जनसंहारार्थ अवतरे ‘ मरकी.’
ती वदते मनुजाला “गमजा नाचि कर उगाचि, रे मरकीं ”
‘ भक्ति ’ अनन्य परोंची भयकर भवपाश तत्क्षणीं तोडी,
‘सुसर’ स्वस्थानस्थित नाचि मत्त मतंगजा कदा सोडी १५९

---

१ वंदनीय पुरुषाची प्रदक्षिणा. २ क्षणांत फुटणारी ३ गोड शब्द करणारी. ४ मणगटाचा वियोग. ५ सोंड. ६ उदार. ७ आहे तशी. ८ पाट ९ शेताला १० सांथीचा रोग. ११ देवाची.

कसिति प्रेमें लोकीं बटु, यति, अतिवृद्ध, मल्ल, ‘ लंगोटी.’
क्रीडापर बाळांच्या रंजनकार्यीं असे अलं ‘ गोटी ’ १६०
शिशु वाङ्मयाब्धिमध्यें ‘ खाडी ’ ‘ बाराखडी ’ करुनि शिरतो,
असतां ‘ मशाल ’ जवळीं दीप्त नर खुशाल गाढ तमिं फिरतो.
‘ गुंडी ’ नसतां लटके पडती बहु कोट पाटलुण सदरे.
बसवी नीट जरीचे कांठ कवण ‘ टांचणी ’—विना वद रे १६२
‘ कातर ’ बहु कामाची, निर्मी ती पत्रिका रुचिर जाळी.
‘ ज्वाला ’ प्रज्वलिता निज तेजें मार्गांत येइ तें जाळी १६३
आवश्यक गेहाला, मनासि, अर्थासि, सिंधुला, ‘ खोली ’
परमेश्वरा प्रिय असे पुष्पफलांची सुगंधि ‘ लाखोली ’ १६४
सकलहि वांछित वस्तू देती मनुजां नृपाधिकृतें ‘ मुद्रा, ’
लोकीं तदानुकूल्यें भरती येते महासुखसमुद्रा १६५
औषधि-वर्गामध्यें बहुमान्या हितकरी असे ‘ शुंठी ’
नाम महौषधि वरिते, हरिते संताप, बहु गदां कुंठी १६६
गेहा प्रासादाला रक्षि ‘ कडी ’ तेंवि त्या कठिण दुर्गा,
रणभूमीवरि वीरां धृति विजयश्री सदैव दे ‘ दुर्गा ’ १६७
‘अक्कल’ ‘शक्कल’ ‘नक्कल’ गुरुं कार्यें साधितातिं नित्य जनीं.
स्तेनां कामिजनांला पापरतां मानवे सदा ‘ रजनी ’ १६८
उंचीवरल्या कार्या साधाया मनुज घेइ ‘ घडवंची. ’
ती बहुमुखी सुरंगी सुरत्नगर्भा विलासिनी ‘ चंची.’ १६९
स्वमदें ‘ स्तुति ’ देवांही खुलवी भुलवी तदन्तरा मळवी.
‘ निद्रा ’ सुखवि दरिद्रां, उद्यमनिरतां, तदाधिही पळवी १७०

---

१ समर्थ २ घराला, मनाला, अर्थाला व समुद्राला खोली असणें आवश्यक आहे ३ राजानें सुरू केलेलें (नाणें.) ४ सुंठ ५ थांबविते ६ रणदेवता. ७ मोठालीं कामें ८ व्यसनांत मग्न झालेल्यांना ९ लवंग, वेलदोडा, कस्तुरी इत्यादि उत्कृष्ट पदार्थ जिच्यांत ती. १० त्यांच्या मनाला ११ त्यांच्या चिंतेला.

'युक्ति' मिळे 'शक्ती-' शीं तरि मग साधी न कोणता अर्थ ?
'भक्ति'स 'विरक्ति' मिळतां येइ करामाजि सहज पुरुषार्थ १७१
'अंगुलि' करास भूषण, करिती तत्कार्य मोडुनी काय.
दोनीं सुदूरदर्शीनें आचमनीं हवनिं रंजनिं सहाय १७२
निज सामर्थ्यें विभवें पूर्वीं पळवी दशाननातंका.
ती कनकाची नगरी म्हणुनी अद्यापि गाजते 'लंका' १७३
जेव्हां करि मानव गृहिं एकाद्या मंगलासि आरंभा
तेव्हां लावी द्वारावरि रम्यें तोरणें तशा 'रंभा' १७४
जनिं होय मानवांची कुशल तशी बहु समर्थ जरि 'जंघा'
तरि त्यांस ती ह्मणेलाचि "तरंगिणी काय ? सिंधूही लंघा" १७५
'सासू' 'लेकी' 'जावा' 'वहिणी' 'माता' 'सुना' 'नणंदा' ही
नसतां भवन वन गमे, तें मनुजाच्या मनासि बहु दाही १७६
लागे विवाहमंगलसमयीं वरातीस 'पालखी' 'घोडी'
भट्टास 'शालजोडी' शोभे, गानीं 'असावरी' 'तोडी' १७७
नांवेंचि 'भैरवी,' बहु मोहि मनाला, तशीच ती 'काफी'
त्यांच्या पुढें प्रतिष्ठा मिरविल हो काय मधुर ही काफी ! १७८
धनधान्याची तेंवी चक्रांतिल मोद देइ शुभ 'रास.'
तेणें प्रसन्न चित्तें मांडी भवनांत मनुज 'आरास' १७९
कवणा मृदुला उष्णा सुखशयना नावडे वदा 'गादी' ?
राजाची कंटकमय; भराति तिच्याही तथापि बहु नादीं १८०
निद्रेसी मदत करी सेवुनियां उत्तमांग ती 'गिरदी'
'प्रासादभित्ति' न ढळे जरि मोठी धडक मारिली द्विरदीं १८१

---

१ दान देण्यांत, दूरचा पदार्थ दाखविण्यांत, आचमन करण्यांत, यजन करण्यांत व मधुर वाद्यें वाजवून करमणूक करण्यांत मदत करिते असा अर्थ २ रावणाच्या चिंतेला. ३ केळी. ४ विद्वानाला. ५ रागविशेष. ६ राशिचक्रांतील ७ सुखावह निद्रा जिच्या ठायीं ती. ८ मस्तक. ९ हत्तींनीं.

बोधक रंजक गोष्टी पौराणिक नातवां कथी ' आजी. '
वार्ता रम्य जिच्या ती दुरोनियां वंद्य होय मम 'आजी' १८२

सर्वसहा[२] अनंता वसुंधरा सागरांबरा नांवें
अन्वर्थक असति जिला, त्या 'भू'चें भाग्य काय वानावें ! १८३

रंजक[३]हस्ता रंजवि[४], बालकमृदुमस्तकासही ' कुंची. '
सुख सोई साधुनियां देते सर्वत्र वास्तुं[६]ची 'उंची' १८४

दीप-ग्रंथ-सुपात्रां[७] आधार उदारधी असे ' तिवई. '
पावोनि अंगभंगा कोपाची सूचना करी ' भिवई ' १८५

' छाया ' सदैव करिते मूळोचें दोषहीन अनुकरण.
पथिक-जना विश्रांती देई ह्मणुनीच वंद्य तत्स्मरण १८६

उल्लासवि मन, जीवन नव देई, नयनहारिणी ' राई. '
अध्वश्रांत[१०] पथिकजनें[११] होति तिचे फार फार उतराई १८७

आनंद धैर्य उपजवि हृदयामध्यें प्रतिक्षणिं ' उमेद '
' मृगया ' बहुगुणयुक्ता खेद हरुनि दूर पळवि तनुमेद १८८

जीरकं[१२]-हिंगु-समन्वित शैत्यासि अरोचका[१३]हि वारि ' कढी '
शत्रूपासुनि जनतेलागीं संरक्षिते सदैव ' गढी ' १८९

स्वीकारुनियां केर प्रेमें आरोग्य देतसे ' कुंडी. '
लघुमूल्यें लघुयत्नें अर्थव्यवहार साधिते ' हुंडी.' १९०

टोळांची, चोरांची, रोगांची, संकटांचिही ' धाड '
येतां समर्थ नोहे कोणीही यावया तिच्या आड १९१

---

१ युद्ध. २ हें व पुढील तीन पृथ्वीचीं सार्थ नांवें आहेत. ३ चित्रकाराच्या हाताला. ४ रंगविते. शोभविते ५ कुंचली, कुंवडें. ६ घराची. ७ दिवा, पोथी व चांगलीं भांडीं यांस. ८ संकोच. ९ ज्याची सावली त्या मूळ पदार्थांचें. १० प्रवासानें थकलेला. ११ वाटसरू. १२ जिरे व हिंग घातलेली (कढी). १३ रुचिनाशालाही.

नरवदनीं नृत्य करिति वांचविती संकटीं तयां ' आणा '
आणा, ही 'दारविनंति' कासाविस करि अकिंचनप्राणा १९२
क्रीडाजित पुरुषाच्या येते अंगावरी पहा ' बाजू. '
द्याया माप बरोबर अनलस राहे उभी जनिं ' तराजू ' १९३
व्यक्ति विशेष न होई प्रकट जरि तिच्यामधें नसे ' खोंचें '
तच्छून्य अर्थ असतां रसिकसमाजीं तया मिळे खो च १९४
बालां वृद्धां तरुणां यक्षिणिची होय विश्रुता ' कांडी '
ती देखा परमाद्भुत चमत्कृतीचा प्रपंचें जनिं मांडी १९५
कोमल धवल करांगुलिसंस्पर्श न लवहि साहते ' जाई '
अतिमधुर हृदयहारी गंध तिचा पवन घेउनी जाई १९६
आम्रावरी वसंतीं कूजन करि ' कोकिला ' स्वरें मधुर.
आनंद होय सर्वां परिसुनि तें, खिन्न एकटा विधुरें. १९७
लोकांत भाग्यवंता लागुनियां लाभते सदा ' पुंजी '
संस्काराच्या समयीं बटुकटिबंधन करीतसे ' मुंजी ' १९८
व्यवहारीं शिष्टांची पाळावी लागते पहा ' रीती '
न जगांत दिसे कोठें निरपेक्ष विशुद्ध फारशी ' नीति ' १९९
परचक्रवारणाला, आंतिल शांतिसहि लागते ' सेना. '
ती असतांना सहसा लोकां बंडाळिचें भय असेना २००
मणिबंधांवरि मिरवे बाळाच्या पूर्णिमादिनीं ' राखी. '
तो देखावा पाहुनि गुरुजन आनंद अंतरीं चाखी २०१
तालसुरावरि विविधा चालींवरि गावयासि ये ' साकी. '

---

१ शपथा २ ( बाजारांतून जिनसा ) घेऊन या. ३ बायकोची विनंति ४ दरिद्री पुरुषाच्या जीवाला ५ माणूस ६ त्या माणसांत ७ मर्म ८ खोच नसणारा. ९ अर्धचंद्र, गचांडी १० विस्तार, बाजार. ११ विरही पुरुष, गतपत्नीक. १२ मुंजमुलाच्या कमरेचें बंधन १३ एक प्रकारचें गवत. १४ मणगट्यावर १५ राखीपूर्णिमेच्या दिवशीं.

‘ रूढी ’ ‘विहीण’ यांचें आर्जव करितांचि येति नव नाकीं !
भक्तां गोपाळांना कविनांही बहु रुचे मनीं ‘ दिंडी ’
होय महाद्वाराचा प्रतिनिधि सुखदप्रवेश ती ‘दिंडी.’ २०३
मोरोपंतकवीच्या हरिती रसिकांतरंग बहु ‘ आर्या. ’
‘ समिधा ’ अति उपयोगी पडती याज्ञिकजना यजनकार्या.
बाळांना तरुणांही आवडते फार फार ‘ चेंडुफळी, ’
ती शिकविते धडे बहु; त्यांतचि मोडावयासिही दुफळी २०५
दर्शविती अबलेचा विजय अशा उपरि वर्णिल्या कांहीं
सुचल्या थोडयाश्या त्या वस्तु, इतरही पहा स्वनयनांहीं २०६
यावरुनी स्पष्ट दिसे अबला कार्यक्षम प्रकट आहे.
निंदा उपहास तिचा मग कैसा वद समंजसां साहे ? २०७
स्त्री आणि पुरुष दोन्ही आवश्यक सारखे समाजास
हें तत्त्व सहज व्हावें मान्य विचारी उदार मनुजास २०८
पुरुषापरी स्त्रियेची उन्नति बहुविध अवश्य साधावी.
देशा अबलाविषयक केव्हांहि कुकल्पना न बाधावी २०९
जी आर्यांची मार्या ती असली पाहिजेच कीं आर्या,
पतिबंधूंच्या संगें व्हावें पुढती तिनें महाकार्या २१०
ऐसें महापद तिला मिळोनि देशासि भाग्य लाभावें
या हेतूनें ‘ अबलाविजय ’ विरचिला असे महाभावें. २११
ज्या विजयादशमीनें नेला साद्यंत सिद्धिला ‘ विजयं ’
अबलाललामभूता ती तिथि देवो नरा सदा विजय ! २१२

---

१ भजकांचा मेळा, दहिहंडी, प्राकृतवृत्त २ मोठ्या दारांतील लहान दार. ३ श्रेष्ठा. ४ मोठया प्रेमानें. ५ या दिवशीं हा लघु ग्रंथ तयार झाला. ६ प्रस्तुत ‘अबलाविजय’ ७ स्त्रीलिंगी शब्दांस भूषणभूत.

## प्रो० लक्ष्मणशास्त्री लेलेकृत इतर पुस्तकें.

| | | रु.—आ. |
|---|---|---|
| १ | अलंकारप्रकाश ... ... ... | १—० |
| २ | पद्यमंजरी ... ... ... | ०—८ |
| ३ | महाराष्ट्र-भामिनी-विलास ( पद्यमय ) ... | ०—१२ |
| ४ | मेघदूताचें समवृत्त मराठी भाषांतर ... | ०—६ |
| ५ | तिलकांजलि ( पद्यमय ) ... ... | ०—४ |
| ६ | सन्मार्गप्रदीप ( लघुनिबंध ) ... ... | ०—४ |
| ७ | विश्वमंगल ( संगीत नाटक ) ... ... | १—० |
| ८ | कै० गंगाधर नरसिंह केतकर यांचें चरित्रः— | |
| ९ | महाराष्ट्रवंदन ( पद्यमय ) ... ... | ०—४ |
| १० | अभिनवकाव्यमाला भाग १ ला व ४ था प्रत्येकीं | १—० |
| ११ | महाराष्ट्रसौंदर्यलहरी ( पद्यमय ) ... ... | ०—४ |
| १२ | गद्यरत्नसमुच्चय भाग २ प्रत्येकीं ... ... | १ - ० |
| १३ | पद्यरत्नसमुच्चय भा. २ प्रत्येकीं ... ... | ०—१० |
| १४ | महाभारताची थोरवी ( गद्य ) ... ... | ०—२ |
| १५ | थोर पुरुषांचीं चरित्रें ( गद्य ) ... ... | ०—२ |
| १६ | रामचरित्राचें रहस्य ( गद्य ) ... ... | ०—६ |
| १७ | भगवद्गीतेचें रहस्य ( गद्य ) ... ... | ०—२ |
| १८ | महत्त्वाकांक्षा ( गद्य ) ... ... | ० - २ |
| १९ | काव्यसौंदर्य ( पद्य ) ... ... ... | ०—१० |
| २० | विष्णुस्मरण ( काव्य अमुद्रित) | |
| २१ | भाऊसाहेब ( ऐतिहासिक नाटक, अमुद्रित ) | |
| २२ | मराठी सुभाषित माला सर पहिला, अमुद्रित ) | |
| 23 | Sanskrit Course of Reading Part I & II | 1-0 |